# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/कला विभाग
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पू),
मुंबई ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कला निकाल कक्ष/३४-अ/२०१६

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कला महाविद्यालयांचे प्राचार्य/विभाग प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की M.A. (Sem-I) (Choice Based Credit Semester System) & (CBSGS) अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in → Exam & Results → examination → Follow the instruction given on the page या वेब लिंक वरून online स्विकारण्यात येतील. परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने **online** अर्ज भरण्याची, **Inward** करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | महाविद्यालयाने **form Submission Report** व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | १५/१०/२०१६ ते २४/१०/२०१६ | २६/१०/२०१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/- सहित | २५/१०/२०१६ ते २७/१०/२०१६ | २९/१०/२०१६ पर्यंत |

**पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे-संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या संकेतस्थळावर online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी online भरलेले परीक्षा प्रवेश अर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाचे Form Submission Fees Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. अन्यथा प्रवेश पत्र (Hall Tickets) मिळणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा प्रवेश अर्जाच्या प्रती (Examination form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.**

**परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दिनांक २७/१०/२०१६ सायंकाळी ६ वाजता Web Link आपोआप बंद होणार** असल्यामुळे परीक्षा प्रवेश अर्ज भरता येणार नाही व परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नाव, विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. जर त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास परीक्षा प्रवेश अर्ज Inward करताना विद्यार्थ्याच्या नावामधील दुरूस्ती करता येईल व इतर दुरूस्तींसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पत्राद्वारे दि **०४ नोव्हेंबर, २०१६** पर्यंत कळवावे.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व सूचनांचे संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- mu.ac.in → Exam & Results → examination → follow the instructions given on the page)

स्थळ : मुंबई.
दिनांक: १५ ऑक्टोबर, २०१६

स्था. परीक्षा नियंत्रक